***IT INDUSTRY TO IPR SECTOR – A SUCCESSFUL JOURNEY***

बायकांना हिशेब कळत नाही, अशी टिप्पणी सहजपणे केली जाते; पण हे म्हणताना महिन्याचं 'गणित' बरोब्बर बसविणाऱ्या गृहिणींचा विचार आपण केलेला असतो का? आणि काही महिला तर एवढ्याच गणितापुरत्या नाही, तर संगणकाच्या गणिती भाषेलाही असं आत्मसात करतात, की त्यांच्याबरोबर त्याचं सख्यच जमतं. आयटी क्षेत्रात अतिशय मोठ्या पदावर पोचलेल्या आणि त्यानंतर त्यालाच पूरक अशा, वेगळ्या वाटेवरून चालू लागलेल्या, 'युनिक आयपीआर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड'च्या मधुवंती केळकर यांच्या प्रवासाची ही कहाणी.

**नव्या क्षेत्राला सामोरं जाण्याचा प्रवास**

मधुवंती केळकर यांनी २२ वर्षांपेक्षाही जास्त काळ आयटी क्षेत्रात विविध पदं, जबाबदाऱ्या आणि कामांचा अनुभव घेतला. एका टप्प्यानंतर त्यांना कामात साचेबद्धपणा आल्याचं लक्षात आलं आणि त्यांनी वेगळी वाट चोखाळायचा निर्णय घेतला. मात्र, आयटी क्षेत्रातला अनुभव वाया जाऊ न देता, उलट त्याचा उपयोग करून घेता येईल, अशा बौद्धिक संपदा अर्थात इन्टेलेक्चुअल प्रॉपर्टी क्षेत्रात प्रवेश करायचं त्यांनी ठरवलं आणि 'युनिक आयपीआर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड'ची स्थापना केली. पेटंट, ट्रेडमार्क, कॉपीराइट अशा क्षेत्रांमध्ये आज त्या कार्यरत आहेत.

हेही वाचा किंवा ऐका :

AA matagold.timesgroup.com ✕

## बौद्धिक संपदेची समृद्ध वाटचाल

मालमत्ता असं म्हणताच आपल्या डोळ्यांसमोर स्थावर किंवा दृष्य स्वरूपातली मालमत्ता, रोख, दागिने, मालमत्ता येते; पण, जी मानवी बुद्धिमत्तेतून तयार झालेली आहे, बुद्धीच्या वापरातून निर्माण झालेली आहे, अशी मालमत्ता म्हणजे बौद्धिक संपदा. यात साहित्य, वैज्ञानिक शोध, उपकरणं, एखाद्या कंपनीचा ट्रेडमार्क यांचा समावेश होतो. मधुवंती केळकर यांनी या क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर भारत सरकारची पेटंट एजंटसाठीची परीक्षा पास केली आणि आज त्या नोंदणीकृत पेटंट एजंट म्हणून काम करतात. एखादी गोष्ट किंवा शोध पेटंट घेण्याजोगं आहे की नाही, याची पडताळणी करण्यासाठी व्यापक संशोधन करण्यापासून प्रत्यक्ष पेटंट मिळवण्यापर्यंतची प्रक्रिया पार पाडण्याची जबाबदारी त्यांची असते.

## महिलांचं प्रमाण नगण्य असलेलं अनवट क्षेत्र

या क्षेत्राबद्दल एकंदरीतच माहिती किंवा जागृतीच कमी असल्यामुळं भारतात नोंदणीकृत पेटंट एजंट्सची संख्याच फार कमी असल्याचं मधुवंती केळकर सांगतात. त्यात पुन्हा महिलांची संख्या आणखी कमी आहे. आयटी क्षेत्रात महिलांचं प्रमाण खूप असलं, तरीही उच्च पदांवर महिला फारशा दिसत नाहीत. पदोन्नती, कौटुंबिक जबाबदाऱ्या, पुरुषांचा लगेच दुखावला जाणारा 'इगो' या गोष्टींमुळे स्त्रियांना आव्हानं आणि समस्यांचा सामना करावाच लागतो. मात्र, परिस्थितीचा योग्य अंदाज घेऊन आपलं काम अचूकपणे करत राहणं हाच यावरचा उपाय आहे, हे अनुभवानं शिकवल्याचं आणि हा गुरुमंत्र आत्तापर्यंतच्या प्रवासात कामी आल्याचं मधुवंती केळकर सांगतात.